# <u>रे.दि.मु.क्र.९२/२०१८ नि.१६२ खालील आदेश</u>

**१.** प्रस्तुत अर्जदार क्रमांक १ ते ३ यांनी वादी क्रमांक १ चे कायदेशीर प्रतिनिधि रेकॉर्डवर घेण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

**२.** प्रस्तुत अर्जाचे कामी अर्जदारांचे असे कथन आहे की, दाव्यातील वादी क्रमांक १ दि. २५/०८/२०२५ रोजी मयत झाला आहे. परंतू, मयत वादी क्रमांक १ ची पत्नी ही वयोवृध्द व आजारी असल्यामुळे मयत वादी क्रमांक १ चे कायदेशीर प्रतिनिधि अभिलेखावर घेणेस उशीर झाला आहे. अर्जात नमुद वारसांशिवाय इतर कोणतेही वारस वादी क्रमांक १ यांना नाही. तरी मयत वादी क्रमांक १ चे कायदेशीर प्रतिनिधि अभिलेखावर घेण्याची परवानगी मिळावी ही विनंती केली आहे.

**३.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी निशाणी क्रमांक १६४ वर म्हणणे दाखल करून तिव्र आक्षेप घेतलेला आहे. अर्जात नमूद कारणे चुकीची, खोटी व लबाडीची आहे. वादी क्रमांक १ चे मुखत्यार म्हणून वारस क्रमांक १ सुरेश याने वेळोवेळी दाव्यात अर्ज दाखल केले आहे परंतू, वादी क्रमांक १ हा मयत आहे ही बाब माहित असून देखील त्यांनी मुदतीत कायदेशीर वारस अभिलेखावर घेतलेले नाही. वादी क्रमांक १ च्या पत्नीच्या आजारपणाचे कारण खोटे व चुकीचे आहे. तरी अर्ज नामंजूर करणेत यावा.

**४.** प्रस्तुत अर्जाचे, अभिलेखावरील कागदपत्रांचे व विधीज्ञांच्या युक्तीवादाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दाव्यातील वादी क्रमांक १ हा दि.२५/०८/२०२५ रोजी मयत झाला आहे. सदरचा दावा हा निरंतर ताकीदीसाठी व घोषणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जात नमुद वारसांशिवाय इतर कोणतेही वारस अस्तित्वात असल्याबाबतचा आक्षेप प्रतिवादींनी घेतलेला नाही. मयत वादी क्रमांक १ यांचे कायदेशीर प्रतिनिधि अभिलेखावर न घेतल्यास अर्जदारांचे अपरिमित नुकसान होणार आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश परीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** अर्ज नि.१६२ मंजूर करण्यात येतो.

**२.** वादी क्रमांक १ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दाव्यात योग्य ती दुरुस्ती आदेश झाल्यापासून १४ दिवसाच्या आत करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

MANOJ CHANDRAKANT NEPTE
Digitally signed by MANOJ CHANDRAKANT NEPTE
Date: 2026.07.01 15:04:09 +0530

शहादा
दि. ०१/०७/२०२६

(**मनोज चं. नेपते**)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, शहादा,
जि. नंदुरबार

**CERTIFICATE**

I hereby certify that the contents of this PDF file are word to word as per the original order

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | Nilesh B. Bhamare |
| Name of the Court | :- | Civil Court, Senior Division, Shahada |
| Date of announcement of order | :- | 01/07/2026 |
| Date of signing of order | :- | 01/07/2026 |
| Date of uploading PDF File | :- | 01/07/2026 |